# महाराष्ट्र शासन
## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार यांचे कार्यालय
## नवीन प्रशासकीय इमारत, टोकर तलाव रोड, नंदुरबार पिन - ४२५४१२
### (गौण खनिज शाखा)

**फोन नंबर : ०२५६४-२१०००६** **ई मेल : miningndb@gmail.com**


**शासकीय जागेवरील गौण खनिज खाणपट्टयांच्या लिलावाकरिता ई-निविदा (टेंडर) व ई-लिलाव (ऑक्शन) अधिसूचना**

क्रमांक/२०२१/गौखनि/कावि-१२७ दि. ०८/०३/२०२१

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन अधिनियम, २०१३ व शासन निर्णय दि. २३/०१/२०१९ अन्वये नंदुरबार जिल्ह्यातील शासकीय जागेवरील एकुण १४ गौण खनिजाच्या खाणपट्टयांचे जाहीर लिलाव ई- निविदा / ई- लिलावाव्दारे करण्यात येत आहे. सदर ई - निविदा / ई - लिलावा बाबतचा तपशिल, अटी व शर्तीसह सविस्तर माहिती गौणखनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार व जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांचे कार्यालय येथे व https://nandurbarmining.abcprocure.com व http://nandurbar.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

गौण खनिज खाणपट्टयांच्या लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीस प्रथम सदर संकेतस्थळावर ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक आहे. ऑनलाईन रजिस्ट्रेशन करीता डिजिटल सिग्नीचर सर्टीफीकेट अनिवार्य आहे. तसेच ई-मेल आयडी, पॅन कार्ड, विक्रिकर विभागाचा TIN क्रमांक, GST सर्टीफीकेट, करारपत्र, मागील ०३ वर्षाचे आयकर व विक्रीकर विवरणपत्र, Address Proof अपलोड करुन रजिस्ट्रेशन करता येईल. लिलावाच्या ई- निविदा / ई- लिलावामध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना अर्ज फी व लिलावात भाग घेण्यासाठी भरावयाचे इसारा रक्कम (EMD) व इतर सर्व रकमा ऑनलाईन पध्दतीने भराव्या लागतील.

❖ **शासकीय जागेवरील खाणपट्टयांच्या जाहिर ई- निविदा (टेंडर) / ई-लिलाव (ऑक्शन) पद्धतीने निर्गती करण्यासाठीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-**

| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | दि. ०९/०३/२०२१ | • ई-निविदा व ई-लिलावाच्या सूचनेची प्रसिध्दी |
| २ | दि.१०/०३/२०२१ ते दि.१८/०३/२०२१ | • दिनांक १०/०३/२०२१ (बुधवार) सकाळी १०.०० वा. पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पद्धतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दिनांक १८/०३/२०२१ (गुरुवार) सायंकाळी ०५.०० पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल. |
| ४ | दि.१०/०३/२०२१ ते दि.२४/०३/२०२१ | • दिनांक १०/०३/२०२१ (बुधवार) रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक २४/०३/२०२१ (बुधवार) रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपावेतो निविदा ऑनलाईन (संगणकीय) पद्धतीने जमा करणे.<br>• दिनांक २४/०३/२०२१ (बुधवार) रोजी सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन (संगणकीय) पद्धतीने स्वीकारणे बंद होईल.<br>• निविदा प्रक्रियेमध्ये तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, सदर निविदा प्रक्रियेस प्रथम किमान एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात येईल. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतल्यास दुसऱ्यांदा एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात येईल. त्यानंतरही तीन निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाल्यास प्रस्तावित खाणपट्टयांच्या ई-ऑक्शनची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ६ | दि.२६/०३/२०२१ | • दिनांक २६/०३/२०२१ (शुक्रवार) सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत ई-ऑक्शन ऑनलाईन सुरु राहील. त्यानंतर ई-ऑक्शनकरिता वेळ वाढवून दिली जाणार नाही. ई-लिलाव (ई-ऑक्शन) संपल्यानंतर ई-निविदा (ई-टेंडर) उघडणेत येईल. |
| ७ | दि.२६/०३/२०२१ | • दिनांक २६/०३/२०२१ (शुक्रवार) दुपारी ०३.०० वाजेपासून पुढे जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे ई-ऑक्शनबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात येईल. |

## - गौण खनिजांचा लिलावांकरिता बोलीदार / खरेदीदारांसाठी महत्वाची सूचना -

- गौण खनिज ब्लॉकची विक्री करण्यासाठी ई-निविदा/ई-लिलाव https://nandurbarmining.abcprocure.com वर आयोजित केले जातील.

- गौण खनिज लिलावात भाग घेण्यासाठी सर्व निविदाकारांनी https://nandurbarmining.abcprocure.com वर नोंदणी करणे आवश्यक आहे.

- डिजिटल सिग्नेचर प्रमाणपत्र वर्ग २ किंवा ३ साइनिंग + एनक्रिप्शन नोंदणीच्या वेळी संलग्न करणे आवश्यक आहे.

- बोलीधारकांना ब्लॉक्स निवडणे व त्यांना खरेदी करायची ब्लॉक्सची दर भरून घ्यावी लागेल, त्यानंतर निवडलेल्या ब्लॉक्ससाठी सहभाग शुल्क, निविदा दस्तऐवज फी आणि ईएमडी देण्यास सक्षम असतील.

- कृपया लक्षात घ्या की, आरटीजीएस / एनईएफटीद्वारे देय रक्कम आपल्या बिडर आयडी मध्ये उपलब्ध करण्यासाठी एक दिवस अगोदर आगाऊ करणे आवश्यक आहे. म्हणूनच कृपया खात्री करा की, आपण पेमेंट गेटवेवर आरटीजीएस / एनईएफटी पर्यायाद्वारे कागदपत्र शुल्क / ईएमडी देयक भरण्या आधी किमान एक दिवस अगोदर निधी पाठवायचा आहे.
- एकदा बोली दाता अंतिम सबमिशन पूर्ण केल्यानंतर, तो इतर ब्लॉक्सना जोडण्यास किंवा बोली करण्यास सक्षम असणार नाही. म्हणूनच बोलीदाराने स्वत: ला त्याच्या बिडने स्वत: ची पूर्तता करावी आणि ती फक्त ई-निविदामध्ये "अंतिम सबमिशन" चरण पूर्ण करेल.
- **शुल्क :** वार्षिक डोमेन नोंदणी शुल्कः INR ५,९००.०० (१८% जीएसटी समाविष्ट) निविदादाराद्वारे निवडलेल्या प्रत्येक ओळ आयटमवर शुल्क आकारणे: रुपये ४,१३०.०० (१८% जीएसटी समाविष्ट करून)

**संपर्क तपशील :-** नोंदणी प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी, डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सत्यापन आणि प्रथम स्तरावरील मंजूरीसाठी, कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

| अ.क्र. | व्यक्तीचे नाव | संपर्क क्रमांक | मोबाइल नंबर | ई - मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | Sonu Tank | ०७९३५०२२१८० | | sonu@abcprocure.com |
| २ | Satabdi Dey | ०७९३५०२२१६७ | +९१ ६३५३२१७०८० | satabdi@abcprocure.com |

ई-निविदा आणि ई-लिलाव मध्ये बोली करताना कोणत्याही तांत्रिक समर्थनासाठी, कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

| एस्केलेशनमॅट्रिक्स | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **नाम** | **मोबाइलनंबर** | **ईमेल आयडी** | **ई- मेल आयडी** |
| १ | Nandan Valera | ९०८१०००४२७ | Nandan.v@eptl.in | support@abcprocure.com |
| २ | Devendra Rajpurohit | ९५१०८१२९७१ | Devendra.r@eptl.in | |
| ३ | Dinesh Kumar | ९३७४५१९७२९ | Dinesh.k@eptl.in | |
| ई-पेमेंट संबंधित समर्थनासाठी, payment@eptl.inवर मेल करा आणि उपरोक्त क्रमांकावर संपर्क साधा. | | | | |

ई- निविदा / ई-लिलाव मधील बोली स्विकारणे किंवा नाकारणे तसेच तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पूढे सुरु ठेवणे संबंधीचा अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी राखुन ठेवलेला आहे. ऑनलाईन ई-निविदा / ई-लिलावाच्यावेळी कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्व्हर, विद्युत, किंवा अन्य तांत्रिक कारणामुळे अडथळा आल्यास जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहित मुदतीत रकमा जमा करणेची पूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल याबाबत इंटरनेट प्रणाली अथवा ऑनलाईन बँकिंगच्या अडचणीची सबब मान्य केली जाणार नाही.

➢ **<u>लिलावधारकासाठी/निविदाधारकासाठी अटी, शर्ती व निर्देश</u> :-**

१. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्याकडे नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक GST Certificate, Digital Signature Certificate व विक्रीकर विभागाचा TIN क्रमांक असणे आवश्यक राहील.

२. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना संपूर्ण महाराष्ट्रात गौण खनिज लिलावासंबंधाने काळ्या यादीत टाकले नसल्याचे स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक आहे.

३. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीकडे भारताचे राष्ट्रीयत्व असणे बंधनकारक आहे.

४. खानपट्टाधारकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असल्यास, त्यांच्याकडे कोणतीही दंडात्मक रकमेची थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील किंवा दंडात्मक कार्यवाही झाली नसल्याचे स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक राहील.

५. खाणपट्टयाच्या लिलावासाठी निश्चित करण्यात आलेल्या हातच्या किमंतीपेक्षा (Upset Price) अधिक रक्कम ई-निविदेत नमूद करावी लागेल तसेच ई-लिलावात बोलीची सुरुवात सदर खाणपट्टयासाठी निश्चित करण्यात आलेल्या हातच्या किमंतीपेक्षा (Upset Price) अधिक रकमेने करावी लागेल.

६. लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना निविदा अर्जावर शुल्क फी रु. ५,०००/- भरणे अनिवार्य राहील.

७. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला इसारा रक्कम म्हणून रु. ५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पाच लाख मात्र) आरटीजीएस व्दारे भरणे अनिवार्य राहील.

८. पर्यावरण विषयक मंजुरी करीता प्रस्तावित "खाणकाम योजना" (Mining Plan) पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) व खाण समाप्ती योजना (Mine Closer Plan) वरील खर्च लिलावधारकास करणे बंधनकारक राहील.

९. लिलावधारकाने खाणीचे निष्पादन करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीच्या यथोचित पालनार्थ प्रति हेक्टर रु. २,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख पन्नास हजार मात्र) या दराने अनामत रक्कम जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचेकडे जमा करणे अनिवार्य राहील. यशस्वी लिलावधारकाने/निविदाधारकाने लिलावाच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्य रित्या पालन केल्यास, लिलावाची मुदत संपल्यानंतर सदर अनामत रक्कम खणिपट्टा धारकास परत करण्यात येईल परंतु अटी व शर्तीचे पालन न केल्यास अथवा उल्लंघन केल्यास सदर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. ज्या लिलावधारकाचा सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारण्यात आला आहे, अशा लिलावधारकाला त्याच्या प्रतीत्रास बोलीनुसार होणाऱ्या किंमतीने भुविज्ञानकीय तांत्रिक अहवालात नमुद केलेल्या अंदाजीत उत्खननाच्या परिमाणाच्या १५ टक्के एवढी रक्कम लिलावाच्या दिवसापासुन सात दिवसांच्या आत आगाऊ स्वामित्वधन

म्हणून शासन जमा करणे बंधनकारक राहील. लिलावापूर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम अशा आगाऊ स्वामित्वधनापोटी भरावयाच्या रकमेत समायोजित करण्यात येईल.

११. यशस्वी लिलावधारकाने केलेल्या करारनाम्याच्या निष्पादनाच्या वेळी खाणकाम आराखड्यानुसार उपलब्ध गौण खनिज तसेच यशस्वी लिलावधारकाने बोली केलेली प्रतिब्रास किंमत विचारात घेऊन येणाऱ्या एकुण रक्कमेवर मुद्रांक शुल्क आकारण्यात येईल. यशस्वी लिलावधारकासोबत/निविदाधारकासोबत खनिपट्टयाच्या लिलावाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे लिलावाची रक्कम रु. १० लाखापर्यंत असल्यास लिलावाच्या रक्कमेच्या ०.१% किंवा रु. १००/- यापैकी जे अधिक असेल तेवढे मुद्रांक शुल्क व लिलावाची रक्कम रु. १० लाखापेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रकमेवर ०.२% मुद्रांक शुल्काची रक्कम लिलावधारकाने/निविदाधारकाने भरणे आवश्यक राहील.

१२. स्वामित्वधनापोटी आगाऊ म्हणून जमा करण्यात आलेल्या रकमेचा प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन संपण्यापूर्वी लिलावधारकाने प्रतिब्रास लिलावाच्याबोलीनुसार महाराष्ट्र गौण खजिन उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या प्रकरण तीन नियम ४६ (१) (दोन) मध्ये नमुद केल्याप्रमाणे खाणपट्टा क्षेत्रातुन काढावयाच्या गौण खनिजावरील स्वामित्वधन शासनजमा करणे आवश्यक राहील. त्यानुसार (i) लिलावधारकाने मंजुर क्षेत्रातील उत्खनन केलेले गौणखजिनावर वेळोवेळी शासनाने निश्चित केलेले स्वामित्वधन भरणे आवश्यक राहील. (ii) लिलावधारकाने प्रत्येक तिमाही समाप्त झाल्यावर १५ दिवसाचे आत स्वामित्वधनाचा भरणा करणे अनिवार्य राहील. त्यानुसार मार्च अखेर, जुन अखेर, सप्टेंबर अखेर, डिसेंबर अखेर याप्रमाणे तिमाही असतील. (iii) स्वामित्वधनाची थकबाकी निश्चित करण्याच्या उद्देशाने, खानपट्टाधारकांने स्वत:च्या मुल्यांकनानुसार वरील देय रकमेची मोजणी करुन त्यानुसार रक्कम जमा करणे आवश्यक राहील. सक्षम अधिकाऱ्यांकडून अंतिम मुल्यांकन मागणीनंतर स्वामित्वधनातील तफावतीची भरपाई करणे देखील लिलावधारकास बंधनकारक असेल.

१३. शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ ०६१५/५१/प्र.क्र.३४/उद्योग-९, दि. ०१.०९.२०१६ अन्वये सर्व प्रकारच्या गौण खनिज खाणपट्टाधारक, परवानाधारक तसेच लिलावधारकाकडून शासनास जमा करण्यात येणाऱ्या स्वामित्वधनाच्या रकमेच्या १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठाणसाठी अंशदान म्हणून भरणा करणे अनिवार्य राहील. लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा तसेच निविदाव्दारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसेल अशा खनिपट्टाच्या १० दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

१४. यशस्वी लिलावधारकास शासनाला देय असणारे स्वामित्वधन, ठोकबंद भाडे, भुपृष्ठ भाडे पाणीपट्टी, जिल्हा परिषद पंचायत समितीचे शुल्क, अकृषक शुल्क व जिल्हा खनिज प्रतिष्ठाण अंशदानाची रक्कम भरणे बंधनकारक राहील.

१५. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातुन करारात नमुद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच गौण खनिजाचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

१६. लिलावाधारकाच्या अनियमितेमुळे लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या खनिपट्टयाच्या क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यात येईल. अशा पध्दतीने लिलाव रद्द केलेल्या खनिपट्टयांच्या फेरलिलावात पुर्वीचा नव्याने लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत असल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पुर्वीच्या लिलावधारकास कोणताही हक्क राहणार नाही.

१७. पर्यावरण विभागाने खानपट्ट्यांना पर्यावरण विषयक मंजुरी देताना दिलेल्या आदेशातील सर्व अटींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१८. लिलावामध्ये खानपट्टा मिळाल्यानंतर करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच खानपट्ट मंजुरी आदेशातील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१९. निविदेतील/ लिलावातील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी यांना राहील व सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविण्यात येईल.

२०. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मध्ये स्वामित्वधनाच्या दरात ०३ वर्षातून एकदा सुधारणा करण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार गौण खनिजाचे स्वामित्वधनाच्या दरात सुधारणा करण्यात आल्यास, सदर स्वामित्वधनाची प्रतीब्रास रक्कम किंवा खनिपट्ट्याच्या लिलावात निश्चित करण्यात आलेली गौण खनिजाची प्रतिब्रास रक्कम यापैकी जी जास्त असेल त्या दराने रक्कम खनिपट्टाधारकास शासनजमा करणे बंधनकारक राहील.

२१. गौण खनिज वाहतूकीकरीता वापरण्यात येणाऱ्या रस्ते / मजूर/वाहने यांच्या देखरेखीची/ संरक्षणाची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

२२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन २०१३ नियम (विकास व विनियमन), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन), २०१३ नुसार शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके, नियम, अधिसूचना इ. मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

२३. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.२३/०१/२०१९ मधील अटी व शर्तींचे लिलावधारकाने पालन करणे बंधनकारक राहील.

२४. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, मंत्रालय, नवी दिल्ली (MOEF) या विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांचे पालन करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

२५. खाणपट्ट्याचा कालावधी करारनाम्याच्या दिनांकापासून ०५ वर्षाचा राहील.

२६. यशस्वी लिलावधारकास/निविदाधारकास लिलावाच्या तारखेपासुन १५ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचेकडे हेतुपत्र (letter of Intent) पत्र देणे आवश्यक राहील. सदर हेतुपत्रामध्ये केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दि.१४ सप्टेंबर, २००६ (EIA Notification २००६) व पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि. १५/०१/२०१६ च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार गौण खनिज उत्खननापूर्वी पर्यावरण अनुमती व महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनिमयन) नियम, २०१३ च्या नियम २० मधील तरतुदीनुसार खाणकाम आराखडा (Mining Plan) तयार करणे अत्यावश्यक आहे. सदर हेतुपत्राच्या दिनांकापासून १२० दिवसांच्या आत यशस्वी लिलावधारकास/निविदाधारकास सक्षम यंत्रणेमार्फत खाणकाम आराखडा तयार करुन घेणे तसेच पर्यावरण अनुमती व इतर आवश्यक असलेली नाहरकत प्रमाणपत्रे आणि हेतुपत्रात जिल्हाधिकारी यांनी नमुद केलेली कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२७. यशस्वी लिलावधारकास/निविदाधारकास जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच शासनाने विहित केलेले कर /शुल्क व जिल्हा खनिज प्रतिष्ठाण करीता शासन वेळोवेळी निश्चित करेल एवढी अशंदानाची रक्कम अदा करणे बंधनकारक राहील. याबाबतचा स्पष्ट उल्लेख कररानाम्यात करणे बंधनकारक राहील.

२८. खनिपट्ट्याची मोजणी संबंधित तहसिलदार/जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे मार्फत यशस्वी लिलावधारकाच्या / निविदाधारकाच्या समक्ष किमान दर सहा महिन्यांनी करण्यात येईल. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन), २०१३ च्या नियम ४६ मधील खाणपट्ट्यासाठीच्या अटी व शर्तीनुसार स्वामित्वधन व

खाणकामासंबंधातील इतर देय रक्कमा भरण्यासाठी शासनाने निश्चित केलेला दिनांक उलटुन गेल्याच्या ६० व्या दिवापासुन स्वामित्वधन व इतर खाणकामासंबंधातील इतर देय रक्कमांच्या विलंबाने केलेल्या प्रदानावर, असे स्वामित्वधन व खाणकामा संबंधांतील इतर देय रक्कमा भरेपर्यंत, प्रतिवर्षी १५ टक्के दराने सरळ व्याज यशस्वी लिलावधारकाकडून/निविदाधारकाकडून आकारण्यात येईल.

२९. लिलावधारकाने/निविदाधारकाने मंजुर व चिन्हांकित केलेल्या एकुण क्षेत्राबाहेर उत्खनन केल्यास, सदर उत्खनन अवैध उत्खनन समजून त्याचा खाणपट्टा रद्द करुन शासनजमा असलेली सर्व रक्कम जप्त करण्यात येईल.

३०. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील नियम ४५ मधील तरतुदीनुसार शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास खनिपट्टा दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच, लिलावाधारकास त्यांना मंजूर केलेला खनिपट्टा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

३१. गौण खनिजांचे उत्खनन करतांना अथवा वाहतूक करतांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात देणे बंधनकारक राहील.

३२. निविदा प्रक्रिया स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीनपेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, सदर निविदा सादर करण्यासाठी किमान एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात येईल.अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीनपेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुसऱ्यांदा एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात येईल. त्यानंतरही तीन निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाल्यास ई-ऑक्शनची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

३३. शासनाने गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या संगणक प्रणालीसाठी मे. शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा.लि. ६९४/१/२/४, आदर्श नगर, सहकार भवन, दुसरा मजला, हॉटेल उत्सव चौक, सिटी प्राईड सिनेमा, सातारा रोड, पुणे-३७ या कंपनीला आदेश क्र.गौखनि १०/०९१५/प्र.क्र.४६३/ख, दिनांक ११/०६/२०१९ अन्वये कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने, लिलावधारकास/ निविदाधारकास गौणखनिजाच्या वाहतूकीसाठी सदर कंपनीमार्फत लागू असलेली प्रणाली तसेच तत्संबंधी सर्व अटी, शर्ती व निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच गौणखनिजवाहतूकीसाठी आवश्यक असलेल्या संगणक प्रणालीचा व वाहतूक परवान्याचा प्रति ब्रास रु. १४/- अधिक जीएसटीप्रमाणे शुल्क लिलावधारक/निविदाधारक यांनी मे. शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा.लि. यांना द्यावा लागेल.

१. गौणखनिज लिलावधारकाला/निविदाधारकाला विहित नमुन्यातील गौणखनिज वाहतूक पास तीन प्रतींमध्ये तहसीलदार यांच्यामार्फत पुरविण्यात येतील. वाहतूक पासची मूळ प्रत वाहनचालकाकडे गौणखनिज वाहतूक करताना देण्यात यावी. वाहतूक पासमध्ये नमूद केलेल्या ठिकाणी गौणखनिज उतरुन घेतल्यानंतर वाहनचालकाने मूळ प्रत खरेदीदाराकडे सुपुर्द करावी. गौणखनिज लिलावधारकाने एक प्रत स्वत: जवळ ठेवावी. उर्वरित एक प्रत तहसीलदार यांच्याकडे जमा करावी. गौणखनिज वाहतूक करतेवेळी वाहतूक पास वाहनासोबत नसल्यास त्या वाहनातील गौणखनिज बेकायदेशीर व अनधिकृत असल्याचे समजले जाईल आणि त्याबाबत लागू असलेल्या कायद्याच्या प्रचलित तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

२. लिलावधारकाने/निविदाधारकाने वाहन चालकाकडे वाहतूक परवाना सुपूर्द करण्यापूर्वी त्याची नोंदणी महाखनिजमध्ये करणे आवश्यक आहे. महाखनिज ॲपसाठी त्यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी, नंदुरबार यांच्याकडून आपले मोबाईल क्रमांक महाखनिज प्रणालीवर नोंदणी करुन घ्यावेत.

३. लिलावधारकाने/निविदाधारकाने e-TP तयार करताना वाहनाची नोंदणी महाखनिज प्रणालीमध्ये करणे बंधनकारक राहील, त्यामध्ये वाहन मालकाचे/चालकाचे नाव, त्याचा दूरध्वनी क्रमांक इ. माहिती अचूक टाकणे आवश्यक राहील. त्यामध्ये तफावत आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

४. लिलावधारकाने/निविदाधारकाने अधिकृत गौणखनिज गटातून गौणखनिज उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील गौणखनिजावाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाहन अधिकृत गौणखनिज गटापासून ते जाण्याचे ठिकाण या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल तपासून परिमाणानुसार बारकोड स्कॅन करून महाखनिज ॲपद्वारे eTP क्रमांक तयार करणे अनिवार्य असेल. प्रणालीकडून लिलावधारकास/निविदाधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनुसार त्यास महाखनिज ॲपव्दारे eTP क्रमांक प्राप्त होईल. सदर eTP क्रमांक बारकोड पावतीवर नमुद करावा लागेल. eTP क्रमांकप्राप्त झाल्याशिवाय व ते वाहतूक पासेस वर नमुद केल्याशिवाय लिलावधारकास/ निविदाधारकास गौणखनिजाची वाहतूक करता येणार नाही. eTP क्रमांकाशिवाय व वाहतूक पासेस शिवाय वाहूतक केल्यास ती वाहतूक अवैध ठरुन त्यावर प्रचलित कायदे व लागू असलेल्या धोरणानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

५. गौणखनिजगटावरुन महाखनिज प्रमाणालीमध्ये e-TP तयार करणे अनिवार्य आहे. गौणखनिजा शिवाय इतरत्र बसून e-TP तयार केल्याचे आढळल्यास लिलावधारकावर/निविदाधारकावर नियमानुसार कारवाई केली जाईल. एखाद्या गौणखनिजगटावर इंटरनेट/मोबाईल नेटवर्क नसल्यास e-TP तयार करण्यासाठी जवळील नेटवर्क असलेल्या क्षेत्रातून e-TP बनविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी घेणे आवश्यक राहील.

६. गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्या चालकाकडे प्रमाणित असलेली वैध पावती आणि त्यावरील उक्त e-TP क्रमांकाची माहिती बरोबर नसेल किंवा त्या वाहतुकीचा वैधता कालावधी संपलेली असेल तर अशी वाहतूक अवैध ठरविण्यात येईल.

७. वाहतूक करतेवेळी वाहनातील परिमाण व वाहतूक पास (e-TP) वर नमूद केलेले परिमाण यामध्ये तफावत आढळून आल्यास सदर वाहनावर दंडात्मक कारवाई केली जाईल.

८. गौणखनिजाची वाहतूक करणा-या वाहनचालकाकडे e-TP क्रमांक तयार केलेली वैध बारकोडयुक्त पावती आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल तथा तपास यंत्रणेकडून केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे e-TP क्रमांक तयार केलेली वैध बारकोडयुक्त पावती आढळली नाही किंवा वैध कालावधी संपलेला असेल तर सदर गौणखनिजाचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

९. गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व e-TP क्रमांक आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हा खनिकर्म अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच महसूल यंत्रणेकडून नियुक्त भरारी पथकांकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तींकडून केली जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व वैध इनव्हाईस नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर गौणखनिजाचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व (८), महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम २०१७, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ आणि शासन अधिसूचना दिनांक १२/०१/२०१८ मधील निर्धारित तरतुदींनुसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

३४. लिलावधारकाने/निविदाधारकाने अटी/शर्तीचे उल्लंघन केल्यास खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

I. लिलावधारकांनी/निविदाधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक खनिपट्टयांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावुन सुध्दा कोणिही लिलावधारक/निविदाधारक बोली बोलण्यास पुढे येत नसल्यास व त्यामुळे

खनिपट्टयांचा लिलाव होऊन शकत नसल्यास अशा प्रकारे संगनमत करुन शासनाच्या महसूलाची नुकसान करणाऱ्या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीसाठी गुन्हे करणाऱ्या लिलावधारकास/निविदाधारकास संपूर्ण राज्यासाठी काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल.

II. गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांकडे वैध बारकोड युक्त वाहतूक पास आहे किंवा नाही, याची शहानिशा वेळोवेळी करण्यात येईल. याबाबतच्या निरिक्षणाच्या वेळी संबंधित वाहन चालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आढळला नाही किंवा वाहतूक पासचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर गौण खनिजाचे उत्खनन/वाहतूक अवैध समजुन त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व ४८ (८) व प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

III. अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणांमध्ये संबंधित खनिपट्टाधारक दोषी आढळून आल्यास त्यांच्या विरुध्द प्रचलित निमयानुसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करतांना संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता कलम, ३४,११४,३७९,३९२,३९३,३९४,३९६ इ. कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम ४८ (८) मधील तरतुदीनुसार गौण खनिजाच्या उत्खननासाठी यंत्रसामग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेले गौण खनिज जप्त करणे इ. कारवाई करण्यात येईल.

IV. गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक इ. अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निर्दशनास आल्यास व अशा ठिकाणी संघटीत गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटीत गुन्हेगारीविरुध्द 'मोक्का' सारख्या अधिनियमान्वये कारवाई करण्यात येईल.

V. यशस्वी लिलावधारकास/निविदाधारकास पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमांतील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर तरतुदीचे उल्लंघन केल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

VI. गौण खनिजाचे उत्खनन करताना किंवा काढताना कोणत्याही शासकीय किंवा खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचविल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व संबंधित लिलावधारकावर/निविदाधारकावर राहील. अशा हानीची नुकसानीची परिगणना जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधित लिलावधारकाकडून/निविदाधारकांकडून करण्यात येईल. यासंबंधी अट करारनाम्यात विवक्षित पणे समाविष्ट करण्यात यावी.

(डॉ. राजेंद्र भारुड)
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**

## ई-लिलावाकरीता शासकीय जागेवरील प्रस्तावित खाणपट्ट्यांची तपशिलवार माहिती - नंदुरबार जिल्हा

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | स्थळ | गट नंबर/सर्व्हे क्र. | एकुण क्षेत्र | प्रस्तावित क्षेत्र (हेक्टर) | अंदाजित परिमाण (ब्रास) | अपसेट प्राईस (प्रति ब्रास रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | नवापूर | नवापूर | १३९/३, | १.८४ | १.८४ | २४२०४ | ४०० |
| २ | | | नवापूर | १४०/१ | ५.६७ | २.५० | २६३१० | ४०० |
| ३ | | शहादा | सारंगखेडा | ४७६ ( I ) | ६२.९२ | २.०० | २७०७५ | ४०० |
| ४ | | | सारंगखेडा | ४७६ (II) | | २.०० | २७०९९ | ४०० |
| ५ | | | डोंगरगाव | २९३ | ७.७४ | २.०० | २६६९३ | ४०० |
| ६ | | | वरुळ त.श. | १३४/४/अ ( I ) | ३३.४१ | २.०० | २७१३१ | ४०० |
| ७ | | | वरुळ त.श. | १३४/४/अ ( ii ) | | १.०० | ११८४६ | ४०० |
| ८ | | | डोंगरगाव | २०६ ( I ) | ४८.६० | २.०० | २४६३१ | ४०० |
| ९ | | | डोंगरगाव | २०६ ( ii ) | | २.५० | ३४७२८ | ४०० |
| १० | | | वडछील | २९५/३/अ (i) | १८.४९ | २.५० | ३४४८८ | ४०० |
| ११ | | | वडछील | २९५/३/अ ( ii ) | | २.०० | २६७८४ | ४०० |
| १२ | | | ससदे | ४९९/१/अ ( I ) | ९९.१३ | २.०० | २६०३० | ४०० |
| १३ | | | ससदे | ४९९/१/अ ( ii ) | | १.०० | ११९८७ | ४०० |
| १४ | | | ससदे | ४९९/१/अ ( iii ) | | २.०० | २७८६९ | ४०० |

(डॉ. राजेंद्र भारुड)
जिल्हाधिकारी, नंदुरबार